## निशाणी क्र. १० वरील आदेश

१. प्रस्तुत अर्ज हा प्रतिवादीने कैफियत दाखल करण्यास झालेला उशीर माफ होवून मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादीचे अर्जात कथन असे की, दिनांक ०४/०४/२०२३ रोजी महावीर जयंतीची सुट्टी असल्यामुळे प्रतिवादी हे कैफियत दाखल करु शकले नाहीत. प्रतिवादीस कैफियत दाखल करण्यास ६५ दिवसाचा उशीर झालेला आहे. प्रतिवादी विरुद्ध विनाकैफियतीबाबत आदेश पारित झालेले नाहीत. प्रतिवादीची कैफियत अभिलेखावर न आल्यास प्रतिवादीचे नुकसान होणार आहे. त्यामुळे प्रतिवादीने कैफियत दाखल करण्यास झालेला ६५ दिवसाचा उशीर माफ होवून कैफियत स्विकारण्याची विनंती केली. प्रस्तुत अर्जाच्या समर्थनार्थ नि.क्र. ११ वर प्रतिवादी यांनी प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे.

२. सदरच्या अर्जावर म्हणणे दाखल केले असून वादीनी अर्जास तीव्र हरकत घेतली आहे. वादीने पुढे कथन केले आहे की, सदरचा अर्ज हा बेकायदेशीर आहे. प्रतिवादीने कैफियत दाखल करण्यास जाणुनबुजून उशीर केलेला आहे. अर्जातील कारणे योग्य नाहीत.

३. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. सदरचा दावा हा रक्कम वसुलीचा आहे. प्रतिवादी यांना कैफियत दाखल करण्यास ६५ दिवसांचा विलंब झालेला आहे. परंतु दाव्याचे स्वरुपा पाहता दावा हा गुणदोषांवर निकाली होणेकरीता दोन्ही पक्षांचे म्हणणे विचारात घेणे आवश्यक आहे. त्यामुळे नैसर्गिक न्याय तत्ववाचा विचार करता प्रतिवादी यांचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरणार आहे. त्यामुळे मी त्याकरिता खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१) प्रस्तुत अर्ज खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२) प्रतिवादी यांना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब रु. २००/— इतक्या खर्चासह माफ करण्यात येत आहे.

३) प्रतिवादी यांनी वर नमूद खर्चाची रक्कम वादी यांना दयावी असे आदेशित करण्यात येते.

४) वादी यांना खर्चाची रक्कम दिल्यानंतर प्रतिवादी यांची कैफियत अभिलेखावर घेण्यात यावी.

GAYATRI SUDHAKAR PATIL
Digitally signed by GAYATRI SUDHAKAR PATIL
Date: 2023.08.25 17:13:18 +0530

(श्रीमती गायत्री एस. पाटील)
३रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
बार्शी, जि. सोलापूर.

दिनांक : २५/०८/२०२३

## CERTIFICATE

"I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/order are same word to word as per original Judgment/order".

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | **S.V. Kokate (Grade III)** |
| Name of the court | : | **Gayatri S. Patil** |
| | | **3rd Jt. CJJD & JMFC,** |
| | | **Barshi, Dist. Solapur.** |
| Judgment/order declared on | : | **25/08/2023** |
| Judgment/order signed by Presiding officer | : | **25/08/2023** |
| Judgment/order uploaded on | : | **25/08/2023** |